# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :– 296 / शि.वि. / सशिअ. दिनांक – 22 / 09 / 2014

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
प्राथ / उच्च प्राथ / माध्य. शाळा
म.न.पा., नागपूर

**विषय :– सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बांधकाम संदर्भात नवी दिल्ली येथे आयोजित 35 व्या बैठकीत दिलेल्या सूचनांबाबत**

**संदर्भ :– सह संचलाक (प्रशासन) मप्राशिप. मुंबई यांचे पत्र क्र. मप्राशिप / सशिअ / बांध सूचना / 2014–15 / 3208 दि. 12 ऑगस्ट 2014.**

संदर्भीय पत्राच्या अनुषगाने आपणास सूचित करण्यात येते की, संदर्भीय पत्रात नमुद केलेल्या आपल्या शाळेशी संबंधीत असलेल्या मुद्दयाबाबतचा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा, जेणेकरून आपण सादर केलेला अहवाल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुबई या कार्यालयास कळविणे शक्य होईल. संदर्भीय पत्रातील मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

1. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत आपल्या शाळेतील सन 2014 – 2015 पर्यंत प्रगतीपथावरील सर्व बांधकामे डिसेंबर 2014 पर्यंत समायोजनासह पुर्ण करावीत.
2. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत आपल्या शाळेतील सन 2014 – 2015 पर्यंत सुरू न झालेली बांधकामे 31 मार्च 2015 पर्यंत समायोजनासह पुर्ण करावीत.
3. U- DISE 2013 – 2014 नुसार ज्या शाळांना अद्याप पाणी पुरवठा, स्वच्छतागृहे उपलब्ध झालेली नाहीत अशा सर्व शाळांना सदर सुविधा कुठल्याही परिस्थितीत मार्च 2015 पर्यंत उपलब्ध करावे. या कार्यालयातर्फे प्रदान करण्यात आलेले पत्र क्र.274 / शि. वि. / सशिअ, दि. 10 / 09 / 2014, नुसार कार्यवाही करावी.
4. शाळेतील स्वच्छतागृहे कार्यरत (Functional) राहण्याच्या दृष्टीने झोन कार्यालयास वेळोवेळी संपर्क साधून पुढील उपाययोजना कराव्यात.
5. आपल्या शाळांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने झोन कार्यालयातर्फे अग्नि प्रतिबंधक व्यवस्था प्राप्त करून घ्यावी.

E:\Rahul\2014-15\Civil Works\Letter

6. शाळेतील विद्यार्थ्यांकरीता पिण्याचे पाणी स्वच्छ मिळण्याच्या दृष्टीने झोन कार्यालयातर्फे वॉटर फिल्टरची व्यवस्था करून घ्यावी. तसेच विद्युतीकरणाची सुविधा सुध्दा झोन कार्यालयातर्फे करून घ्यावी.
7. शाळेतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने आपतकालीन परिस्थितीचा सामना करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण / Mock drill द्वारे प्रशिक्षण दयावे.
8. शाळेतील अपंग विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेता त्यांना आवश्यक त्या सर्व भौतिक सुविधा शाळांमध्ये उपलब्ध करून दयाव्यात.
9. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत ज्या सोयी–सुविधा उपलब्ध करणे शक्य नाही त्या शासनाच्या ईतर योजना तसेच लोकसहभागातून उपलब्ध करणेबाबत प्रयत्न करावेत.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

**प्रतिलिपी : सविनय माहितीस्तव सादर :–**
1. मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर
2. मा. अपर आयुक्त, महानगरपालिका नागपूर
3. मा. उपायुक्त, महानगरपालिका नागपूर
4. कनिष्ठ अभियंता झोन क्र. ..........., म.न.पा. नागपूर
5. ........................... शहर साधन केंद्र समन्वयक, म.न.पा. नागपूर

sd

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

E:\Rahul\2014-15\Civil Works\Letter